मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 26 जुलै 2024 | पान- 1

# कामगारनगरी जलमय मुसळधार पावसामुळे दाणादाण

## मुळा, पवना, इंद्रायणी नदीला पूर : शहरातील नागरीवस्तीत पाणी शिरले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुळशी व मावळ तालुक्यांसह शहर परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे मुळा, पवना, इंद्रायणी नद्यांना पूर आला आहे. शहरातील विविध भागांतील रस्ते व घरांमध्येही पाणी शिरल्याने उद्योगनगरी जलमय झाली आहे. अनेक नागरिकांनी रात्र जागून काढली असून, पूरग्रस्तांना निवारा केंद्रात स्थलांतरित केले आहे.





- पुणे-नाशिक महामार्गावर भोसरीतील लांडगेनगर ते पांजरपोळ आणि गंधर्वनगरी ते मोशी कचरा डेपोपर्यंत पाणी साचले
- मदर तेरेसा होम परिसरात मेहता हॉस्पिटलजवळ पावसाचे पाणी साचले
-लांडगेनगरयेथीलमोकळ्या जागेतइंद्रायणीनगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला पाण्याची तळी.
- भोसरीतील चक्रपाणी वसाहत, बालाजीनगर, शांतिनगर,लांडगेनगर आदी भागातील घरांमध्ये पाणी
- शांतीनगर औद्योगिक वसाहतीतील सुमारे तीनशे वर्कशॉपमध्ये पाणी
-चिखली घरकूल परिसरात पावसाचे पाणी साचले.
-ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर आले. पाण्याचा निचरा करण्याचे काम सुरू
- अभिनवनगर जुनी सांगवी येथील कन्नडवस्ती आंबेडकरनगरमधील झोपड्यांमध्ये नदीचे पाणी शिरले
-जुनी सांगवी मधुबन सोसायटी परिसरात पाणी शिरले
- काही भागात झाडपडीच्या घटना
- पुनावळे रस्ता येथील भुयारी मार्ग, मोरवाडी लालटोपीनगर परिसर, औंध रावेत बीआरटी मार्ग आदी ठिकाणी पाणी साचले
- थेरगाव गॅस दाहिनी येथे पाण्याची पातळी वाढल्याने तेथील वीजपुरवठा बंद
- थेरगाव केजुदेवी मंदिर पाण्याखाली
- चिंचवड केशवनगर भागात पोद्दार शाळेमागे पवना नदीचे पाणी रस्त्यावर
-पवना नदीची पातळी वाढल्याने चिंचवड गावातील मोरया गोसावी समाधी मंदिरात शिरले पाणी
- थेरगाव व चिंचवड जोडणाऱ्या पवना नदीवरील पुलाला टेकले पुराचे पाणी
- वाकड-हिंजवडी रस्त्यावर पेट्रोल पंपाजवळ रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन फुटांपर्यंत पाणी, वाहनाचालकांची कसरत
- आकुर्डी त लो हमार्गाखालील भुयारी मार्गात साचले पाणी
- मोशी-आळंदी बीआरटीएस रस्त्यावरील सस्तेवाडी तालीम मंडळाजवळील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी
- मुंबई-पुणे महामार्गावरील पिंपरी, चिंचवड स्टेशन व आकुर्डी ग्रेडसेपरेटरमध्ये पाणी साचल्याने निगडी ते नाशिक फाटा मुख्य रस्ता रहदारीसाठी बंद, सेवा रस्त्याने वाहतूक
- किवळे, सांगवी, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, चऱ्होली स्मशानभूमी पाण्याखाली
- जुनी सांगवीतील मधुबन सोसायटी, शिक्षक कॉलनी, मुळा रोड, मुळानगर, पवारनगर, ममतानगर, संगमनगर भागात पाणी, श्रीदत्त आश्रमही पाण्याखाली
- पवना नदीच्या पुरामुळे चिंचवड केशवनगर, तानाजीनगर, काकडेपार्क; पिंपरीतील भाटनगर, बौद्धनगर, सुभाषनगर, रमाईनगर, वैभवनगर, संजय गांधीनगर, मिलिंदनगर; रहाटणी गावठाण नदीकाठचा भाग, कासारवाडी नदीकाठचा भाग, दापोडी सिद्धार्थनगर, पवारनगरमध्ये शिरले पाणी
- मोरवाडीतील लालटोपीनगर, सम्राट चौक, ऑटो क्लस्टर मागील भागात पाणी साचल्याने नागरिकांचे हाल
- फुगेवाडी पत्राचाळीत पाणी शिरल्याने रहिवाशांचे महापालिकेच्या मीनाताई ठाकरे शाळेत स्थलांतर
- इंद्रायणी नदीवरील जुना पूल, मोशी अंत्यसंस्कार विधी, दशक्रिया विधी घाट पूर्णपणे पाण्याखाली
- काळेवाडीतील इंडियन कॉलनीतील ५० घरात आणि पवनानगरमध्येही पाणी शिरले
- दापोडीत गुलाबनगर, पवारनगर परिसरात घरांमधून पाणी तुंबल्याने रहिवाशांना महापालिकेच्या शाळेत स्थलांतरित केले आहे
- फुगेवाडी पत्राचाळीत पाणी शिरल्याने रहिवाशांचे महापालिकेच्या मीनाताई ठाकरे शाळेत स्थलांतर
- जुनी सांगवी मुळानगर झोपडपट्टी वसाहतीत पाणी शिरल्याने रहिवाशांचे महापालिका शाळेत स्थलांतर

### मातोश्री सोसायटीतील रहिवाशांची सुटका

» मोशी येथील प्राधिकरणातील पेठ क्रमांक चारमधील मातोश्री गृहनिर्माण सोसायटीमध्ये आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राकडून आलेले सर्व पाणी पार्किंगमध्ये घुसल्याने निम्मी वाहने पाण्याखाली गेली. विद्युतदाब असलेल्या मीटरला पाणी लागायला फक्त दोन फूट शिल्लक होते. अडकलेल्या नागरिकांना अग्निशामक दलाच्या जवानांनी बाहेर काढले तसेच पाणी बाहेर काढून देण्यासाठी प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रातील नाले मुख्य नाल्याला जोडण्याची मागणी मातोश्री गृहनिर्माण सोसायटीमधील राजेंद्र गाडे, धनंजय कचरे, नीलेश कोकणे आदींनी केली आहे. मोशी-चिखली सीमेवरील रिव्हर रेसिडेंसी या गृहनिर्माण हौसिंग सोसायटीच्या काही फुटांवर इंद्रायणीच्या पुराचे पाणी ब्लू लाईन ओलांडून येऊन ठेपले आहे.

# आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी एनडीआरएफची मदत; आयुक्तांची माहिती

## शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत आहे, नदीकाठी राहणाऱ्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत आहे. शिवाय धरणक्षेत्रातून या नद्यांमध्ये वेळोवेळी होणारा विसर्ग लक्षात घेता नदीकाठी राहणाऱ्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे. तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ महापालिका नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, महापालिका व पोलीस प्रशासनाच्या वतीने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करून प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी एनडीआरएफ तुकडीला शहरात पाचारण करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यभागातून पवना नदी वाहते. पवना धरण क्षेत्रातील पावसाचा वाढता जोर आणि पाणीपातळीत होणारी



वाढ लक्षात घेता धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी सायंकाळी 4 वाजता पवना जलविद्युत केंद्रामधून विद्युत गृहाद्वारे 1400 क्युसेक क्षमतेने विसर्ग नदीपात्रात सुरू करण्यात आला असल्याची माहिती पवना धरण पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने देण्यात आली आहे. पावसाचे प्रमाण आणि तीव्रता लक्षात घेता आवश्यकतेनुसार या विसर्गामध्ये रात्रीच्या सुमारास वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या नदीकाठावर वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांनी सतर्क रहावे. तसेच मुळा नदी वाकड, पिंपळेनिलख, सांगवी, पिंपळेगुरव, दापोडी, बोपखेल आदी भागातून वाहत जाते. या नदीमध्ये मुळशी धरणाच्या सांडव्यावरून सुमारे 7500 क्युसेक्सने विसर्ग सायंकाळी 5 वाजता करण्यात आल्याची माहिती मुळशी धरण कक्षाच्या वतीने देण्यात आली आहे. मुळा आणि मुठा नदीचा संगमाच्या ठिकाणी पाण्याचा फुगवटा निर्माण झाल्याने मुळा नदी पात्रातील पाण्याच्या पातळीत अधिक वाढ होते. अशा परिस्थितीत या नदीकाठी राहणाऱ्या रहिवाशांनी दक्ष राहणे गरजेचे असून वेळेत सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्षाच्या 020-67331111 / 020-28331111 या क्रमांकावर त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून त्या त्या भागातील पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे. आतापर्यंत शहरातील सुमारे 2800 पेक्षा अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी निवारा केंद्रांमध्ये तसेच महापालिका शाळांमध्ये हलविण्यात आले असून याठिकाणी भोजनासह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी तसेच निवारा केंद्रांवर भेट देऊन आढावा घेतला आहे..

### शहरात विविध 39 ठिकाणी झाडपडीच्या घटना

» दरम्यान, शहरात विविध 39 ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या असून आपत्कालीन यंत्रणा आणि उद्यान विभागाद्वारे तातडीने कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे. बचावकार्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन दलासह आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित असून पाण्यात अडकलेल्या व्यक्तींना काही ठिकाणी बोटीने सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. संपुर्ण परिस्थितीवर मुख्य नियंत्रण कक्षाद्वारे बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून आयुक्त शेखर सिंह प्रत्येक घटनेचा आढावा घेत आहेत.

# उद्योगनगरीतील 2800 नागरिकांचे स्थलांतरण

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून त्या त्या भागातील पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे. आतापर्यंत शहरातील सुमारे 2800 पेक्षा अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी निवारा केंद्रांमध्ये तसेच महापालिका शाळांमध्ये हलविण्यात आले आहे. याठिकाणी भोजनासह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शहरात विविध ठिकाणी बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती महापालिकेच्या (PIMPRI) वतीने देण्यात आली आहे. 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील सम्राट चौक, लालटोपी नगर, भाटनगर, पिंपरी (PIMPRI) रिव्हर रोड, रामनगर, पत्राशेड लिंकरोड, बौद्धनगर आदी ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे 650 नागरिकांना भाटनगर पिंपरी शाळा, आंबेडकर कॉलनी, मेवणी हॉल, निराधार हॉल पिंपरी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.



'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील चिंचवड येथील तानाजी नगर , काळेवाडी येथील पवनानगर, रावेत येथील समीर लॉन्स, शिंदे वस्ती रस्ता, जाधव घाट आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून सुमारे 300 नागरिकांना काळेवाडी येथील महापालिकेच्या प्राथमिक शाळेत तसेच दत्तोबा काळे इंग्रजी मिडीयम स्कूलमध्ये स्थलांतरीत केले. 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत लक्ष्मीनगर गल्ली क्र. 3,4,5,6, पवार वस्ती, पिंपळेगुरव, भुजबळ वस्ती, वाकड आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून 31 नागरिकांना पिंपळेगुरव येथील नवीन मुला मुलींच्या शाळा नं. 54 येथे तर 10 नागरिकांना वाकड येथील आबाजी भूमकर शाळेत स्थलांतरित करण्यात आले आहे. 'ई' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत रामनगर, बोपखेल येथे 20 ते 25 घरांमध्ये तीन ते चार फुट पाणी शिरले होते. याठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे 100 नागरिकांचे मनपाच्या बोपखेल येथील प्राथमिक शाळेत स्थलांतरण करण्यात आले आहे. 'फ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत घरकुल, श्रीराम कॉलनी, तळवडे, डिफेंस कॉलनी, पाटीलनगर, चिखली आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले. या ठिकाणांहून साचलेले पाणी तसेच घरांमध्ये शिरलेले पाणी काढण्यात आले आहे. तसेच नदीकाठच्या नागरिकांना सूचना देऊन स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत संजय गांधी नगर, आंबेडकर नगर, सुभाष नगर, पवना नगर, जगताप नगर, संजय गांधी नगर या ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे 330 नागरिकांना कमला नेहरू शाळा, पिंपरी येथे, 450 नागरिकांना रहाटणी शाळा येथे, 40 नागरिकांना थेरगाव शाळा येथे तर 50 नागरिकांना विवेकानंद बॉक्सिंग हॉल येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत हिराबाई झोपडपट्टी, कासारवाडी, भारत नगर, फुगेवाडी, दापोडी परिसर मुळानगर, मधुबन सोसायटी, जुनी सांगवी आदी ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून 150 नागरिकांचे कासारवाडी उर्दू शाळेत, सुमारे 300 नागरिकांचे मीनाताई ठाकरे महापालिका शाळेत, सुमारे 150 नागरिकांचे दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग महापालिका शाळेत स्थलांतर तर सुमारे 300 नागरिकांचे जुनी सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेत स्थलांतर करण्यात आले आहे. अद्याप शहरातील विविध ठिकाणी नियंत्रण पथके तैनात असून बचावकार्य सुरू आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ महापालिका नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, महापालिका व पोलीस प्रशासनाच्या वतीने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करून प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओढ्याचा प्रवाह चिरत कारजवळ पोचले अन्.. प्रसंगावधानाने वाचवले कोहली पिता-पुत्राचे प्राण

## बापलेकाची चार चाकी चऱ्होलीतील भोसले वस्तीजवळील डी. वाय. पाटील रस्त्याजवळील इंद्रायणी नदीला मिळणाऱ्या ओढ्याच्या प्रवाहात सापडून वाहत गेली

**पुणे | प्रतिनिधी**

हरिद्वारवरून आळंदीतील इंद्रायणी रुग्णालयात कर्करोगावर उपचार करण्यासाठी आलेल्या बापलेकाची चार चाकी चऱ्होलीतील भोसले वस्तीजवळील डी. वाय. पाटील रस्त्याजवळील इंद्रायणी नदीला मिळणाऱ्या ओढ्याच्या प्रवाहात सापडून वाहत गेली. चऱ्होलीतील सामाजिक कार्यकर्ते योगेश भोसले यांनी प्रसंगावधान वेळीच त्यांना बाहेर काढल्याने त्यांचे प्राण वाचले.





हरिद्वार येथे राहणारे राजेश कोहली यांना कर्करोग झाला आहे. त्यांच्या उपचारासाठी त्यांचा मुलगा तुषार कोहली यांनी आळंदीतील इंद्रायणी रुग्णालयाची गुरुवारची (ता. २५) भेटण्याची वेळ घेतली होती. तेव्हा ते हरिद्वारवरून कारने आळंदीच्या दिशेने निघाले होते.

चऱ्होलीतील भोसले वस्ती डी. वाय. पाटील रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून त्यांची कार ओढ्याच्या प्रवाहाला लागल्याने वाहून जात होती. सामाजिक कार्यकर्ते योगेश भोसले यांनी प्रसंगावधान राखत ओढ्याचा प्रवाह चिरत कारजवळ पोचले.

तोपर्यंत ओढ्याजवळ बघ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. मात्र पाण्याचा प्रवाह पाहून कोणीही कोहली आणि भोसले यांच्या मदतीला धावले नाहीत. इंद्रायणी नदीला मिळणाऱ्या या ओढ्याला पुढे दहा ते वीस फूट खोल खड्डा होता. जर कोहली यांची कार पुढे वाहत गेली असती तर त्यांना वाचविणे अवघड झाले असते.

त्याचप्रमाणे कार आणखी खोल पाण्यात गेली असती, तर ती लॉक होऊन त्यांना वाचविण्यात अडचण आली असती. या धोक्याची कल्पना आल्याने भोसले यांनी जीवाची परवा न करता ओढ्याच्या प्रवाहात कारच्या दिशेने गेले. नशीब बलवत्तर म्हणून भोसले यांनी घराकडे ये-जा करण्यासाठी बांधलेल्या आणि पाण्याखाली गेलेल्या पुलाला कोहली यांची कार अडकून थांबली. राजेश यांना बाहेर काढत असताना ते पाण्याच्या प्रवाहाने वाहत गेले.

मात्र प्रसंगावधान राखत भोसले यांनी त्यांचा हात घट्ट धरून प्रवाहाच्या बाहेर काढले. भोसले यांनी कोहली यांचा घरी पाहुणचारही केल्याने राजेश कोहली आणि तुषार कोहली पाहुणचाराने भारावून गेले. या घटनेनंतर हा रस्ता प्रवासासाठी बंद करण्यात आला.

हरिद्वार येथे राहणारे राजेश कोहली यांना कर्करोग झाला आहे. त्यांच्या उपचारासाठी त्यांचा मुलगा तुषार कोहली यांनी आळंदीतील इंद्रायणी रुग्णालयाची गुरुवारची (ता. २५) भेटण्याची वेळ घेतली होती. तेव्हा ते हरिद्वारवरून कारने आळंदीच्या दिशेने निघाले होते.

# आदर्शनगर-मोशीतील रस्त्याला अखेर 'ग्रीन सिग्नल'

## जागा ताब्यात घेण्याबाबतचा प्रश्न निकालात : भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आदर्शनगर- मोशी येथील गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न अखेर निकालात निघाला आहे. सदर रस्त्यासाठी जागा ताब्यात घेण्यासाठी जागा मालक विकसकासोबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यामुळे आगाऊ ताबा घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



पुणे- नाशिक महामार्गाला जोडणारा आदर्शनगर- मोशी येथील गट नं. ४५३/१ व ४५४/१ पैकी क्षेत्र १२२००.०० चौ. मी. पैकी ६० मी. व १२ मी. रस्ता रुंदी क्षेत्र २८२६. ५६ चौ. मी. क्षेत्राचे प्रपत्र- अ करण्याची कार्यवाही सुरू झाली. त्यामुळे रस्त्याच्या कामासाठी जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, या भागातील सुमारे २५ हजार नागरिकांच्या रहदारीचा प्रश्न निकालात निघाला आहे.

भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी २०१४ मध्ये मोशी कचरा डेपो परिसरातील 'बफर झोन' कमी करण्याबाबतचा मुद्दा निवडणुकीच्या अजेंड्यावर घेतला होता. त्यानुसार, राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करुन त्यांनी १०० मीटरपर्यंत बफर झोन कमी केला. परिणामी, ४०० मीटर बफर झोन हद्दीत पायाभूत सोयी-सुविधा निर्माण होण्यास गती मिळाली.

दरम्यान, आदर्शनगर- मोशी येथील रस्ता जागा ताब्यात नसल्यामुळे रखडला होता. यावर स्थानिक नागरिकांनी सदर रस्ता सुरू करण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्याकडे मागणी केली होती. यावर आमदार लांडगे, जागामालक विकसक आणि प्रशासनाचे अधिकारी यांची बैठक झाली. सामोपचाराने रस्त्यासाठी जागेचा ताबा देण्यात जमीन मालकांनी परवानगी दिली. त्यामुळे प्रपत्र- अ आणि जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू केली.

पावसाळ्यामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. परिणामी, सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. किरकोळ अपघाताच्या घटना वाढल्यामुळे नागरिकांत नाराजीचा सूर होता. संबंधित विकसकाने ताबा दिल्यामुळे आगामी काही दिवसांत रस्त्याचे काम पूर्ण होईल.

> “ समाविष्ट गावांतील अंतर्गत रस्ते, डीपी रस्ते विकसित करण्यासाठी आम्ही सकारात्मक भूमिका घेतली. व्यापक जनहिताच्या भूमिकेतून जागामालक विकसक व भूमिपुत्र शेतकऱ्यांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. आदर्शनगर-मोशीतील जागा मालकांचे यासाठी मनापासून आभार मानले पाहिजेत. कारण, त्यांच्या पुढाकारामुळे सुमारे २५ हजार नागरिकांना दिलासा मिळणार आहे. समाविष्ट गावांच्या विकासासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# चिंचवडमधील श्री मोरया गोसावी मंदिर पाण्यात

## मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पात्रात पाण्याची पातळी वाढली : नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरासह मावळ भागात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पात्रात पाण्याची पातळी वाढली आहे. यामुळे चिंचवड भागातून जाणाऱ्या पवना नदीच्या पात्राचे पाणी चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदिरात शिरले आहे. मंदिराचा संपूर्ण परिसर पाण्याखाली गेला आहे. पाणी पाहण्यासाठी अनेक जण य भागात गर्दी करित असून नदी काठच्या सर्वच नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



गेल्या २४ तासांत लोणावळा परिसरात तब्बल ३७५ मिलीमिटर पावसाची नोंद झाली आहे. सतत सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे थेरगाव येथील केजूबाई बंधारा, पुनावळे येथील बंधारे ओसंडून वाहत आहेत. पवना नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची वाढ झाली असून चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदिरात पाण्यात गेले आहे.

कालपासून पावसाची संतधार सुरु आहे. पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण ७० टक्क्यांपर्यंत भरले आहे. शहरातील अनेक भागातील रस्ते जलमय झाले आहेत. शहराच्या विविध भागात पाणीच पाणी झाले आहे. पवना नदीतील पाण्याच्या पातळीत जोरदार वाढ होत आहे. सतर्कतेचा इशारा म्हणून पिंपरी चिंचवड सह जिल्ह्यातील सर्व शाळांना जिल्हा प्रशासनाने सुट्टी जाहीर केली आहे.

थेरगाव येथील केजूबाई बंधारा तुडूंब भरून वाहू लागला आहे. तसेच पुनावळे येथील बंधाराही ओसांडून वाहत आहे. त्यामुळे चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदीर अर्धे पाण्यात गेले आहे. कालपासून संततधार सुरू असल्यामुळे पाणी शिरले असून परिसरातील नागरिक हे पाणी पाहण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

मावळ परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. लोणावळा धरण भरत आले आहे. त्या धरणातून इंद्रायणी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग होणार आहे. दरम्यान नदीमध्ये पाण्याचा प्रवाह वाढला आहे. मावळ परिसरातील बहुतांश पाणी इंद्रायणी नदीत येते. इंद्रायणी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने अनेक पुल पाण्याखाली गेले आहेत. त्या पुलांवरून वाहतूक करण्यास प्रशासनाने मनाई केली आहे. चिखली येथून मोई गावाकडे जाणाऱ्या इंद्रायणी नदीवरील पुलावर पाणी आले आहे. कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासनाने खबरदारी म्हणून हा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे.

**शहरातील आपत्कालीन पूर नियंत्रण हेल्पलाइन..**

मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्ष: 020-28331111/67331111, क्षेत्रीय कार्यालय (अ): 020-68334050/9922501454, क्षेत्रीय कार्यालय (ब): 9922501456, क्षेत्रीय कार्यालय (क): 020-68334550/9922501458, क्षेत्रीय कार्यालय (ड): 020-6834750, 9922501460,क्षेत्रीय कार्यालय (इ): 020-020-68335050, 8605722777, क्षेत्रीय कार्यालय (फ): 020-68335350, 8605422888, क्षेत्रीय कार्यालय (ग): 020-68335550,7887879555,क्षेत्रीय कार्यालय (ह): 020-68335750, 9130050666, अन्य हेल्पलाइन क्रमांक: सारथी हेल्पलाइन: 8888006666, परिवर्तन हेल्पलाइन: 9379909090.

### पवना धरण क्षेत्रात अतिमुसळधार पाऊस

**» पवना धरण परिसरात गेल्या २४ तासांमध्ये तब्बल ३७४ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे आज (दि.२५) सकाळी ८ वाजेपर्यंत धरण साठ्यात १४.९८ टक्के इतकी वाढ झाली आहे. सध्या धरणातील पाणीसाठा ६९.११ टक्के इतका झाला आहे. बुधवारी पवना धरणात ५४.१३ टक्के इतका पाणीसाठा होता. मात्र धरण क्षेत्रात आज (दि.२५) सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तासांत ३७४ मि.मी. इतका विक्रमी पाऊस झाला आहे. तर यंदाच्या वर्षी आत्तापर्यंत १५९६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे एकाच दिवसात धरणातील पाणीसाठ्यात १४.९८ टक्के इतकी वाढ होऊन सध्या धरणातील पाणीसाठा ६९.११ टक्के इतका झाला आहे.**

# ससून रुग्णालयात माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार

## बेवारस रुग्णाला डॉक्टरांनी नेऊन सोडलं निर्जनस्थळी : प्रशासनाकडून डॉक्टरवर निलंबनाची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

ससून रुग्णालयातील माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन्ही पाय नसलेल्या व्यक्तीला अज्ञात स्थळी फेकताना डॉक्टरांना स्टिंग ऑपरेशन करून रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी संबंधित डॉक्टरला निलंबित करण्यात आले आहे.

डॉ. आदि कुमार असे या डॉक्टरचे नाव आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली असून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती ससूनचे डीन डॉ. एकनाथ पवार यांनी दिली.



दादासाहेब गायकवाड हे बेवारस रुग्णांची सेवा करतात. रस्त्यावर बेवारस पडलेल्या जखमी व्यक्तींना ते ससून रुग्णालयात दाखल करतात. एका बेवारस रुग्णाला त्यांनी ससूनमध्ये उपचारासाठी दाखल केले होते. परंतु दुसऱ्या दिवशी गायकवाड त्या रुग्णाला पाहण्यासाठी ससूनमध्ये गेले असता तो रुग्ण गायब झाल्याचे लक्षात आले. या संदर्भात चौकशी केल्यावर "त्या रुग्णाला रात्री डॉक्टर घेऊन गेले, परत आणले नाही," अशी माहिती त्यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला.

बेवारस रुग्णांसंदर्भात काहीतरी गैरप्रकार ससून रुग्णालयात सुरू आहे, अशी माहिती गायकवाड यांना मिळाली होती. हा प्रकार उघडकीस आणण्यासाठी त्यांनी रितेश गायकवाड यांच्यासोबत ससून रुग्णालयाबाहेर काही दिवसांपासून पाहणी सुरू केली. त्यानुसार सोमवारी (दि. २२) पहाटे दीड वाजता रितेश गायकवाड रिक्षा घेऊन ससून रुग्णालयाबाहेर उभे होते. त्यावेळी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना रिक्षावाला असल्याचे समजून "एका रुग्णाला सोडून यायचे आहे. येणार का," अशी चौकशी केली. "कुठे सोडायचे," असे विचारल्यावर "इथून लांब नेऊन सोड. पुन्हा हॉस्पिटलमध्ये आला नाही पाहिजे," असे उत्तर त्यांना मिळाले. त्यांनी "नेमके कुठे सोडू? मी एकटा कसा नेऊन सोडू? नातेवाईक सोबत पाहिजे," असे सांगितल्यावर डॉक्टरांनी "तू नवीन आहेस, आमचा नेहमीचा रिक्षावाला पाचशे रुपये दिले की बरोबर सोडून येतो," असे सांगितले.

काही वेळाने डॉक्टरांनी सांगितल्यानुसार नवीन बिल्डिंगमधला दोन्ही पाय नसलेला, हातात सुई व विविध ठिकाणी जखमी झालेला एक रुग्ण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी रिक्षात बसवला. त्या रुग्णाला घेऊन रिक्षासोबत डॉक्टर आणि त्यांचा सहकारी विश्रांतवाडी येथील एका दाट वडाच्या झाडाजवळ पोहोचले. अंधारात आणि पावसात त्या रुग्णाला त्या झाडाखाली सोडून डॉक्टर निघून गेले. काही वेळाने

### हे डॉक्टर रुग्णांच्या शरीराचे अवयवदेखील विकतील...

» आमदार धंगेकर म्हणाले, डॉक्टर बेवारस रुग्णांना निर्जनस्थळी सोडून देतात. काही दिवसांनी हेच डॉक्टर रुग्णांच्या शरीराचे अवयव विक्री करण्यासदेखील मागेपुढे पाहणार नाहीत. त्यामुळे अशा डॉक्टरांचे तातडीने निलंबन झाले पाहिजे. त्यांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे असे प्रकार पुन्हा होणार नाहीत. खासगी रुग्णालयातील दर परवडत नाहीत म्हणून अनेक रुग्ण सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येतात, पण सरकारी रुग्णालयात होणारी पिळवणूक, मिळणारी अपमानास्पद वागणूक वाढत चालली आहे. त्यातूनच हा निर्जनस्थळी सोडून देण्याचा प्रकार घडला आहे, जो डॉक्टरांमधील असंवेदनशीलता दाखवणारा आहे.

रितेशने पोलिसांना याबाबत माहिती दिली आणि दादासाहेब गायकवाड यांच्या मदतीने त्या रुग्णाला पुन्हा ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. येरवडा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रारदेखील दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार सोमवारी रात्री उशिरा येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतचा व्हीडीओदेखील समोर आला आहे. या व्हीडीओमध्ये ससून रुग्णालयातील डॉक्टर बेवारस रुग्णांना रात्री गुपचूप निर्जनस्थळी सोडून देत असल्याचा आरोप वंचितच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. कॉंग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी ससूनचे डीन डॉ. एकनाथ पवार यांची भेट घेऊन संबंधित डॉक्टरांना निलंबन करण्याच्या मागणीचे निवेदन दिले. निलंबन केले नाही तर उपोषणाला बसण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला होता.

> बेवारस रुग्णांना निर्जनस्थळी सोडून देणाऱ्या डॉक्टरांचे तातडीने निलंबन झाले पाहिजे. त्यांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. जेणेकरून असे प्रकार पुन्हा होणार नाहीत.
> **- रवींद्र धंगेकर, आमदार, कॉंग्रेस.**

# शहरातील पूल झाले 'पिकनिक स्पॉट'

## अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण : पुण्यातील वाहतूक कोंडीवर पालकमंत्री अजित पवार यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरण साखळीत मुसळधार पाऊस झाल्यानंतर मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले. पाणी सोडण्यात आल्यानंतर मुठा नदीला पूर आला. मुठा नदीचा पूर पाहण्यासाठी शहरातील विविध पुलांवर नागरिकांनी सहकुटुंब गर्दी केली होती. गर्दीचे नियोजन, तसेच दुर्घटना टाळण्यासाठी पोलिसांनी शहरातील विविध पुलांच्या परिसरात बंदोबस्त ठेवला आहे.

गेल्या वर्षी शहरात पाऊस कमी झाला होता. त्यामुळे मुठा नदीला पूर आला नव्हता. गेल्या वर्षी धरणातून पाणी सोडण्यात आले होते. मात्र, मुठा नदी दुथडी भरून वाहिली नव्हती. आठवडाभरापासून शहर परिसरात पाऊस सुरू आहे. गेले दोन दिवस मुसळधार पाऊस झाल्याने धरणातून मोठ्या प्रमाणावर सोडण्यात आले. बुधवारी मध्यरात्रीनंतर पाणी पातळीत वाढ झाली. सकाळी महापालिका भवनजवळील जयंतराव टिळक पूल, तसेच भिडे पूल वाहतुकीस बंद करण्यात आले. प्रशासनाने शाळा, महाविद्यालये, कार्यालयांना सुट्टी जाहीर



केली. गुरुवारी दुपारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला. त्यानंतर अनेकांनी सहकुटुंब मुठा नदीचा पूर पाहण्यासाठी गर्दी केली होती.

शनिवार पेठेतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल, डेक्कन जिमखाना भागातील छत्रपती संभाजी पूल, छत्रपती शिवाजी पूल, कसाबा पेठेतील डेंगळे पूल, म्हात्रे पूल, येरवड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेतू,

### मेट्रोतून पूरदर्शन

» पुलांवर गर्दी झाल्याने अनेकांनी मेट्रोतून प्रवास केला. वनाज ते रामवाडी मार्गिकेवरील गाडीतून प्रवास करून अनेकांनी पूरदर्शनाचा आनंद लूटला. काहीजणांनी खास पूर पाहण्यासाठी मेट्रोतून प्रवास केला.

तसेच येरवड्यातील जुना पूल परिसरात नागरिकांनी गर्दी केली होती. अनेकांनी सहकुटुंब मुठा नदीचा पूर पाहण्याचा आनंद घेतला. दिवसभर शहरातील विविध पुलांवर गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. पुलाच्या परिसरात पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता. गर्दीचे नियोजन, तसेच अनुचित घटना टाळण्यासाठी बंदोबस्त तैनात केला.

**धरणांमधील पाणीसाठा टीएमसी, कंसात टक्क्यात**

टेमघर २.१२ (५७.२७)
वरसगाव ८.०४ (६२.७४)
पानशेत ८.१३ (७६.३१)
खडकवासला १.९७ (१००)
एकूण २०.२७ (६९.५३)